।। धनावर विश्वास ठेवण्यापेक्षा
विश्वासावर धन ठेवा।।

# संकल्प

## को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

(रजि. नं.: बी.ओ.एम./आर.एस.आर./८८३ सन ७८)

# ४५ वा

## वार्षिक अहवाल
## २०२२-२०२३

**आजची बचत**
**सुरक्षित आणि**
**सक्षम भविष्यासाठी**







कार्यालय :-
१६, तृप्ती सदन सोसायटी, ९० फूट रोड,
पोलिस चौकीच्या मागे, काजुपाडा, मुंबई - ४०० ०७२.

# विद्यमान संचालक मंडळ



**श्री. अशोक निवृत्ती नलावडे**
अध्यक्ष



**श्री. कुंडलिक महादू कांबळे**
उपाध्यक्ष (०५/०६/२०२३ पर्यंत)



**श्री. बबन मनोहर कोल्हे**
उपाध्यक्ष (०६/०६/२०२३ पासून)



**श्री. शंकर गुंडू येजरे**
सल्लागार

## संचालक



श्री. शिवाजी वामन जगदाळे
(०५/०६/२०२३ पर्यंत)



श्री. विजय लक्ष्मण निकम



श्री. भास्कर शामराव गायकवाड



श्री. अविनाश अशोक नलावडे



श्री. मारुती लक्ष्मण सोपनार
(०५/०६/२०२३ पर्यंत)



सौ. सुनंदा अशोक नलावडे



सौ. सविता शिवाजी जगदाळे
(०५/०६/२०२३ पर्यंत)



सौ. निर्मला रोहिदास थस
(०६/०६/२०२३ पासून)



श्री. पांडुरंग शंकर शिंदे
(०५/०६/२०२३ पर्यंत)



श्री. मोहनदास माधव हेगडे
(०६/०६/२०२३ पासून)



श्री. त्रिवेणी सियाराम शर्मा
(०६/०६/२०२३ पासून)



श्री. जगन्नाथ हरिश्चंद्र नलावडे
तज्ञ संचालक



श्री. [illegible]
तज्ञ संचालक



श्री. [illegible]
कार्यकारी अधिकारी

# संकल्प को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

१६, तृप्ती सदन हौ. सोसायटी, ९० फुट रोड पोलीस चौकीच्या मागे, काजुपाडा, कुर्ला (प), मुंबई-७२.

## ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

या नोटीसीद्वारे **संकल्प को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड** च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की सदरहून सोसायटीची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ३०/०९/२०२३ रोजी सायंकाळी ठिक ६.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. अशोक निवृत्ती नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली तृप्ती सदन को. ऑप. हौ. सोसायटी लि., चर्चहॉल, ९० फिट रोड, पोलिस चौकीच्या मागे, काजुपाडा, कुर्ला (प), मुंबई - ४०० ०७२. येथे घेण्यात येणार आहे. या सभेत खालील विषयांवर विचार विनिमय करण्यात येणार आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दिनांक २८/१२/२०२२ रोजी झोलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१/३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, तांळेबंद व नफ-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या प्रमाणे नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२२-२३ सालच्या वैद्यानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२३-२४ सालाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०२३-२४ या वर्षाकरिता वैद्यानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.
७) अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
८) संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९) सन २०२१-२२ सालच्या दोषदुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
१०) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

आपले नम्र सहकारी
कार्यकारी मंडळाच्या सम्मतीने

मुंबई
दिनांक : १५/०९/२०२३

**श्री. अशोक नलावडे**
अध्यक्ष

**श्री. रमेश हरेकर**
कार्यकारी अधिकारी

### विशेष सूचना

१. सभासदांना सुचना अगर ठराव सभेपुढे आणावयाचे असल्यास तसेच पतपेढीच्या कामासंबधी प्रश्न विचारायाचे असल्यास त्यंनी सभेच्या तारखेच्या ७ दिवस अगोदर कार्यालयात लेखी कळवावे. पतपेढीत आलेल्या लेखी सुचना व प्रश्नांचांच विचार केला जाईल तसेच ईमेलवर प्रश्न विचारावे.
२. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेतली जाईल. त्या सभेस गणपूर्तीचे (कोरमचे) बंधन राहणार नाही. सभेत विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३. सभेला हजर असताना अहवालाची प्रत सोबत ठेवावी.

# ४५ वा वार्षिक अहवाल

सन्माननिय सभासद बंधू - भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या ४५वा वार्षिक अहवाल व दिनांक ३१/०३/२०२३ अखेरच्या वैधानिक लेखा परिक्षकानी प्रमाणीत केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आपणापुढे सादर करताना आनंद होत आहे.

संस्थेची वाटचाल सस्थेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहकार्यामुळेच होत आहे. संस्थेच्या पंचेचाळीसवा अहवाल वर्षातील प्रगती ही सभासदांच्या सहकार्याचे फळ आहे. संस्थेच्या ठेवी वाढविण्यासाठी संचालक मंडळानी प्रयत्न केले आहेत. संस्थेच्या प्रगतिसाठी यापुढेही सर्वच सहकार्य करतील अशी आशा आहे.

२२/९/२०१३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत १७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने आपल्या उपविधीमध्ये आवश्यक बदल मंजुर करुन सुधारीत उपविधी सहकार खात्याकडे पाठविण्यात आले होते. त्यांस दिनांक २०/११/२०१३ रोजी मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (पुर्व उपनगरे) मुंबई यांनी मान्यता दिली असून ते तात्काळ प्रभावाने अंमलात आले आहेत.

सुधारीत उपविधीतील कमल १४ अन्वये क्रियाशिल सभासदात्वासाठी रु. १००/- चे भाग धारण करणे आवश्यक आहे. तसेच ठेव खाती शिल्लक पतसंस्थेच्य खेळते भांडवलच्या प्रमाणात खालील प्रमाणे असले पाहिजे.

| अ. क्र. | खेळते भांडवल | किमान ठेव |
|---|---|---|
| १) | रु. २५ लाखा पेक्षा कमी | रु. १,०००/- |
| २) | रु. २५ लाखा पेक्षा जास्त आणि<br>रु. १ कोटी पेक्षा कमी | रु. २,५००/- |
| ३) | रु. १ लाखा पेक्षा जास्त आणि<br>रु. २५ कोटी पेक्षा कमी | रु. ५,०००/- |

किंवा

रु. ५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त कर्ज घेतलेले असले पाहिजे. सदर कर्ज व्यवहार संपूर्ण कालावधी मध्ये केंव्हाही अनुत्पादक कर्जामध्ये समाविष्ट नसले पाहिजे. त्याच प्रमाणे ५ वर्षातून किमान एकदा सर्वसाधारण सभेस उपस्थिती आवश्यक आहे.

**सभासद** - ३१ मार्च २०२२ अखेरला संस्थेचे एकूण १३७६ सभासद होते. अहवाल वर्षात नवीन ८५ सभासद झाले व ३० सभासदांनी राजीनामे दिले त्यामुळे ३१ मार्च २०२३ अखेर १४३१ सभासद आहेत.

**भाग भांडवल** - वर्षारंभी वसूल भाग भांडवल रु. २८,६९,४६०/- इतके होते. अहवाल वर्षात रु. १०,५७,१००/- ने भर पडलेली असून अहवाल वर्षात रु. ५,१६,१००/- परत केले. वर्षाअखेर एकूण भाग भांडवल रु. ३४,१०,४६०/- आहे.

**ठेवी** - अहवाल वर्षात सर्वांच्या सहकार्याने ठेवीत वाढ झालेली आहे. इतर सभासदांनी ही आपल्या संस्थेत गुंतवणूक करावी, ही विनंती.

## ठेवी सन - २०२२-२०२३

| क्र. | ठेवीचा प्रकार | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | वाढ | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १. | बचत ठेव | ११,४०,३४०.०० | २०,५९,१९६.०० | ९,१८,८५६.०० | ८०.५७% |
| २. | मुदत ठेव | २,८८,१६,३३९.०० | २,८१,९०,९७९.०० | -६,२५,३६०.०० | -२.१७% |
| ३. | मासिक प्राप्त ठेव | ९९,७०,०००.०० | १,१५,९५,०००.०० | १६,२५,०००.० | १६.२९% |
| ४. | दैनंदिन ठेव | ३२,८६,०१५.०० | ४७,७४,८१२.०० | १४,८८,७९७.०० | ४५.३०% |
| ५. | दरमहा ठेव | ३,७६,५३०.०० | ६,६४,०३०.०० | २,८७,५००.०० | ७६.३५% |
| ६. | संकल्प आर्वत ठेव | २७,८३,१५२.०० | ३२,७१,५५२.०० | ४,८८,४००.०० | १७.५४% |
| ७. | दाम दुप्पट ठेव | ३१,७०,१९५.०० | ३३,६७,६९५.०० | १,९७,५००.०० | ६.२२% |
| ८. | अनामत ठेव | ----- | ----- | ----- | ----- |
| | एकूण ठेवी | ४,९५,४२,५७१.०० | ५,३९,२३,२६४.०० | ४३,८०,६९३.०० | ८.८४% |

मागील वर्षी संस्थेकडे रु. ४,९५,४२,५७१.०० च्या ठेवी होत्या. त्यामध्ये या वर्षी रु. ४३,८०,६९३.०० नी वाढ होऊन वर्षाअखेर एकूण ठेवी रु. ५,३९,२३,२६४.०० च्या झाल्या आहेत.

**सभासदांना कर्ज** - वर्षारंभी सभासदांकडून रु. ४,०७,८६,१३४.०० कर्ज येणे होते. अहवालवर्षात रु. १,७३,८१,६०३.०० वसुल झाले व सभासदांना रु. २,३३,९०,०००.०० नविन कर्ज दिले. अहवाल वर्षाअखेर रु. ४,६७,९४,५३१.०० कर्ज येणे आहे.

**खेळते भाग भांडवल** - वर्षारंभीचे ०१/०४/२०२२ चे संस्थेचे खेळते भाग भांडवल रु. ५,६१,४१,९४४.३९ होते. अहवाल वर्षात रु. ८१,६५,२९०.४० ने वाढ झालेली असुन

३१/३/२०२३ अखेर संस्थेचे खेळते भाग भांडवल रु. ६,४३,०७,२३४.७९ एवढे झाले आहे.

<u>नफा विभागणी</u> – दिनांक ३१/३/२०२३ अखेरचा निव्वळ नफा रु. ६,५४,२०३.३३ अधिक गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ३,९१०.३९ मिळविता एकूण नफा रु. ६,५८,११३.७२ ऐवढा झालेला आहे. नफा विभागणीस संचालक मंडळ खालील प्रमाणे शिफारस करीत आहे.

| अ. क्र. | निधीचा तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | राखीव निधी २५% | १,६४,५२८.०० |
| २. | सभासदांना लाभांश १०% | २,९८,५००.०० |
| ३. | इमारत निधी | ६०,०००.०० |
| ४. | सभासद कल्याण निधी | ३०,०००.०० |
| ५. | लाभांश समिकरण निधी | २५,०००.०० |
| ६. | निवडणूक निधी | ४०,०००.०० |
| ७. | कर्मचारी प्रशिक्षण निधी | २५,०००.०० |
| ८. | शिल्लक नफा | १५,०८५.७२ |
| ९. | संशियत बुडीत कर्ज निधी | ---- |
| | एकूण | ६,५८,११३.७२ |

<u>सोने तारण कर्ज</u> - सोने तारण कर्ज ही गरजु सभासदांसाठी आर्थिक अडचणीत संजीवनी देणारी व्यवस्था आहे व संस्थेच्या धोरणाप्रमाणे संस्थेने या वर्गासाठी सोने तारण कर्जाची मंजुरी व वितरण व्यवस्था अत्यंत सोपी व सुटसुटीत केली आहे. अत्यंत गरजेच्या वेळी सभासदांना सोने तारण कर्ज तत्परतेने उपलब्ध करुन दिले जाते.

<u>संचालक व त्यांच्या नातेवाईकाना दिलेले कर्जे</u> - संचालक व त्यांच्या नातेवाईकाना असे कोणतेही कर्ज मंजुर केलेले नाही. त्यामुळे येणेबाकी नाही.

# आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये संस्थेने केलेल्या व्यवसायातील प्रगती

| अ. क्र. | तपशील | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | झालेली वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | ठेवी | ४,९५,४२,५७१.०० | ५,३९,२३,२६४.०० | ४३,८०,६९३.०० |
| २. | कर्जे | ४,०७,८६,१३४.०० | ४,६७,९४,५३१.०० | ६०,०८,३९७.०० |
| ३. | गुंतवणुक | १,२२,९४,९६८.०० | १,५३,१६,६८७.०० | ३०,२१,७१९.०० |

**<u>वैधानिक लेखापरिक्षण</u>** - महाराष्ट्र शासन यांनी मान्यता दिलेल्या तालिकेनुसार श्री. राजेश आर. गुलदगड (पॅनल नं. १०१५४८९ मुंबई) यांनी संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले. त्यांनी प्रमाणित केलेली हिशोब पत्रके व त्यावरील लेखापरीक्षण अहवाल सोबत जोडले आहेत. संस्थेच्या आर्थिक स्थिती व कामकाजबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. आपणांस कळविण्यात आनंद होत आहे. सन २०२२-२०२३ या अहवाल सालाकरिता त्यांनी "अ" वर्ग प्रदान केला आहे.

**<u>थकबाकी व अनुत्पादित कर्जाचे प्रमाण</u>** - कोवीड १९ मुळे सर्व व्यावसायात मंदीचे सावट आल्या कारणाने, कर्ज वसुली होऊ शकली नव्हती. म्हणुन संस्थेला थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर कारवाई करणे भाग पडले म्हणुन थकबाकी व निव्वळ एन.पी.ए कमी करु शकलो. दि. ३१/३/२०२३ अखेर थकबाकी रु. ३३,७३,०४८.०० प्रमाण ७.२० % आहे. अनुत्पादित कर्जे यांची सहकार खात्याच्या नियमानुसार संपुर्ण तरतुद संस्थेने केलेली आहे. सन २०२२-२०२३ अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ४.८७ % आहे.

**<u>कार्यकारी मंडळाच्या सभा</u>** - अहवाल वर्षात कार्यकारी मंडळाच्या १२ सभा झाल्या सभेत संस्थेच्या भरभराटीच्या दृष्टीने व नियमित कामकाजीविषयी एकमताने निर्णय घेण्यात आले.

<u>आभार</u> - संस्थेच्या प्रगतीसाठी व सुरळीत कामकाजासाठी अनेक व्यक्ती व संस्था यांचे मार्गदर्शन मिळत असते त्या सर्वांचा उल्लेख करणे अशक्य आहे. परंतु या सर्वांचे आभार मानून काही प्रतिनिधीक नावांचा उल्लेख करीत आहोत विशेषतः मुंबै बँकेचे संचालक श्री. शिवाजीराव नलावडे, जिल्हा उप.निबंधक (पूर्व उपनगरे) मुंबई, श्री. धोंडे पाटील (संचालकः के.एन.एस. बँक), श्री. विठ्ठल विरकर (संचालकः के.एन.एस. बँक), डॉ. महाजन (सुंदरबाग को-ऑप. क्रे. सोसा.), श्री. सदानंद घाटे (पार्वती को-ऑप. क्रे. सोसा.), श्री. अनिल जाधव (हिंदुस्थान को-ऑप. क्रे. सोसा.), श्री. नागेश लवटे, श्रीरंग ग्राहकसहकारी संस्था-कजुपाडा, तसेचे शासकिय हिशोब तपासणीस श्री. एस. एस. शिंदे २ रे लेखा परिक्षक, श्री. ए. एल. गावडे (प्रमाणीत लेखापरिक्षक) सौ. वर्षा दाते (प्रमाणीत लेखापरिक्षक) श्री. अशोक बी. कुऱ्हाडे (प्रमाणीत लेखापरिक्षक) श्री. डी. एस. चव्हाण, श्री. रामलाल आर. बिंद (प्रमाणीत लेखापरिक्षक) श्री. मधुकर गायकर (प्रमाणीत लेखापरिक्षक) श्री. राजेश गुलदगड (प्रमाणीत लेखापरिक्षक) व उपनिबंधक सहकारी संस्था एल वार्ड, मुंबई, सहकारी अधिकारी, मुंबई जिल्हा सहकारी बँक येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल व संस्थेला लाभलेल्या सहाकार्याबद्दल संस्था त्यांचे ऋणी आहे. अहवाल सालाप्रमाणे यापुढेही सर्वजण असेच सहकार्य करतील अशी अपेक्षा ठेवून, येथेच अहवाल पुर्ण करीत आहोत.



आपले स्नेहांकित



**श्री. अशोक निवृत्ती नलावडे**

**अध्यक्ष**

**श्री. बबन मनोहर कोल्हे**

**उपाध्यक्ष**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

# अंदाज पत्रक

## संस्थेचे सन २०२२-२०२३ चे वार्षिक अंदाज पत्रक

| क्र. | तपशील | सन २०२२-२०२३ | | सन २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| | | अंदाज | प्रत्यक्ष | अंदाज पत्रक |
| १. | वसुल भाग भांडवल | ३०,००,०००.०० | ३४,१०,४६०.०० | ४०,००,०००.०० |
| २. | निधी | २९,००,०००.०० | ३६,३७,५२८.०० | ३९,००,०००.०० |
| ३. | ठेवी | ५,१०,००,०००.०० | ५,३९,२३,२६४.०० | ५,७५,००,०००.०० |
| ४. | कर्जे | ४,२०,००,०००.०० | ४,६७,१४,५३१.०० | ५,००,००,०००.०० |
| ५. | प्रशासकिय खर्च | १७,००,०००.०० | १४,४२,८००.६० | १७,००,०००.०० |
| ६. | उत्पन्न | ८०,००,०००.०० | ८६,१३,६५४.०० | ९६,००,०००.०० |
| ७. | नफा | ६,००,०००.०० | ६,५४,२०३.३३ | ७,००,०००.०० |
| ८. | खेळते भांडवल | ६,००,००,०००.०० | ६,४३,०७,२३४.७१ | ७,००,००,०००.०० |

महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि नियम ६९(३) अन्वये घ्यावयाचा

# शासकिय लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,
अध्यक्ष / सचिव / मुख्य कार्यकारी अधिकारी
संकल्प को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई
१६, तृप्ती सदन हौ. सोसायटी, ९० फिट रोड, पोलिस चौकीच्या मागे, काजुपाडा,
कुर्ला (प), मुंबई - ४०० ०७२.

विषय : नेमणूक पत्र संदर्भ क्र. वार्षीक सर्वसाधारण समिती सभा दिनांक २८.१२.२०२२ ठराव क्र. ६
दिनांक ३१.०३.२०२३ अखेर प्रमाणित लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल

१) संकल्प को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०२३ पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरण पत्रक आणि हिशोबाच्या धोरणांचा अर्थपुर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंतचे केले आहे.

## व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

## लेखापरिक्षकाची जबाबदारी

३) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिटूयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतीतत्वाच्या पालनाची जरुरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपुर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षामध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर, आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपुर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षकचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पुर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे.

(एक) ताळेबंद पत्रकाच्या संबधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२३

(दोन) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत, जमा आणि खर्च, त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी, आणि

**इतर काययेदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल**

७) महाराष्ट्र सरकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरण पत्रक तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

८) (अ) आम्हाला मिळालेल्या महितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरुर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

(ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आलेले आहे.

(क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशोब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

**१०) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो :**

(एक) या अहवालसंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा अणि तोटा आणि खर्चाचा हिशोब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

(दोन) आम्ही पुस्तकाची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंपत्रके जी अधिकारानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

(तीन) आम्ही लेखापरिक्षा केलेल्या शाखांचे ताळेबंदपत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हाला जरुरीचा आहे. त्याप्रमाणे दिलेला आहे.

(चार) लेखापरिक्षा चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला **"अ"** वर्ग मिळाला आहे.

सही

स्थळ - मुंबई

**श्री. राजेश आर. गुलदगड**

दिनांक : २९/०८/२०२३

प्रमाणित लेखापरिक्षक (को-ऑप. सोसायटीज, मुंबई - पॅन नं. १०११५८९)

# संकल्प को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/३/२०२२ | भांडवल व देणी | | ३१/३/२०२३ |
|---|---|---|---|
| ७५,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ७५,००,०००.०० |
| २८,६९,४६०.०० | **वसुल भाग भांडवल** | | ३४,१०,४६०.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी** | | |
| ६,८६,९९९.०० | राखीव निधी | ७,८४,७८७.०० | |
| ६,१९,६८२.०० | इमारत निधी | ७,०८,३८२.०० | |
| १०,९०,०००.०० | संशयित व बुडीत कर्ज निधी | १८,०१,०००.०० | |
| ९०,२८३.०० | उत्तम जिंदगी निधी | ९९,२८३.०० | |
| १९,५००.००० | सभासद शिक्षण निधी | १९,५००.०० | |
| ९५,०००.०० | निवडणुक निधी | १,१५,०००.००० | |
| ७३,०००.०० | सभासद कल्याण निधी | ७३,०००.०० | |
| १६,५७६.०० | कर्मचारी शिक्षण निधी | ३६,५७६.०० | |
| ७१,०००.०० | लाभांश समीकरण निधी | ---- | ३६,३७,५२८.०० |
| | **सभासद ठेवी** | | |
| ९९,७०,०००.०० | मासिक प्राप्त ठेव | १,१५,९५,०००.०० | |
| २,८८,१६,३३९.०० | मुदत ठेव | २,८१,९०,९७९.०० | |
| ३२,८६,०१५.०० | दैनंदिन ठेव | ४७,७४,८१२.०० | |
| ११,४०,३४०.०० | बचत ठेव | २०,५९,११६.०० | |
| ३,७६,५३०.०० | दरमहा ठेव | ६,६४,०३०.०० | |
| २७,८३,९५२.०० | संकल्प आवर्त ठेव | ३२,७१,५५२.०० | |
| ३१,७०,११५.०० | दामदुप्पट ठेव | ३३,६७,६९५.०० | ५,३९,२३,२६४.०० |
| | **चालू देणी व तरतुदी** | | |
| ३२,५००.०० | लेखापरिक्षण शुल्क | ४५,५००.०० | |
| ---- | मुदत ठेव व्याज | ३,४१,०००.०० | |
| ६,१८,६२०.०० | लाभांश | ५,५८,५२७.०० | ९,४४,५२७.०० |
| | **मुंबई बँक अधिकर्ष कर्ज** | | १७,३३,३४२.०७ |
| ३,१६,७५३.३९ | **नफा तोटा खाते** | | |
| | मागील वर्षाचा नफा | ३,१६,७५३.३९ | |
| | वजा नफा विभागणी | ३,१२,८४३.०० | |
| | | ३,९१०.३९ | |
| | अधिक अहवालसाली नफा | ६,५४,२०३.३३ | ६,५८,११३.७२ |
| ५,६१,४१,९४४.३९ | | | ६,४३,०७,२३४.७९ |

हिशोब तपासले ते बरोबर आहेत. माझ्या दिनांकाच्या अहवालात पात्र ठेवून दि. २९-०८-२०२३

**श्री. राजेश आर. गुलदगड**
प्रमाणित लेखापरिक्षक (को-ऑप. सोसायटीज, मुंबई - पॅन नं. [illegible])

# दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/३/२०२२ | मालमत्ता व येणी | | ३१/३/२०२३ |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक** | | |
| ६,६२,३४३.३६ | रोख शिल्लक | ६,४८,५५६.३६ | |
| ३,१७,४१६.७५ | कुर्ला नागरीक बँक | १,९५,५६६.३५ | |
| ११,७२,५२९.७० | एम.डी.सी.सी.बँक साकीनाका | १,९५,४३४.०० | |
| ६६,७७१.०८ | एम.डी.सी.सी.बँक | १,४१,७५४.०८ | |
| ३४१.०० | एम.डी.सी.सी.बँक (अधिकर्ष) | ---- | |
| ३५६.५० | एम.डी.सी.सी.बँक (अधिकर्ष) | १५६.०० | ११,८१,४६६.७९ |
| | **गुंतवणूक** | | |
| १,०००.०० | मुंबै बँक-भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | म. रा. पतसंस्था फेडरेसन भाग | ३,०००.०० | |
| १००.०० | महाराष्ट फेडरेशन भाग | १००.०० | |
| १,०९,७४,६४८.०० | मुंबई बँक मुंदत ठेव | १,३९,५७,१९५.०० | |
| ८,१५,२२०.०० | राखीव निधी (मुंबई बँक मुंदत ठेव) | ८,५४,३९२.०० | |
| ५,००,०००.०० | कुर्ला नागरिक बँक | ५,००,०००.०० | |
| १,०००.०० | बृहन्मुंबई पतसंस्था फेडरेशन भाग | १,०००.०० | १,५३,१६,६८७.०० |
| | **सभासद कर्जे** | | |
| ९,५७,८६२.०० | सभासदांकडून येणे कर्ज | ६,५१,४४४.०० | |
| १८,१५,४४२.०० | ठेव तारण कर्ज (येणे) | २०,५३,५३६.०० | |
| १४,१९,७५६.०० | सोने तारण कर्ज (येणे) | ९,७७,३५९.०० | |
| १०,७७,१९४.०० | वाहन तारण कर्ज (येणे) | १०,२७,६४५.०० | |
| ११,४०,५९८.०० | व्यवसाय कर्ज | १४,५६,९८०.०० | |
| ७७,४१,६२५.०० | मालमत्ता कर्ज | ९४,९४,७५३.०० | |
| २,६६,३३,६५७.०० | गृह तारण कर्ज | ३,११,३२,८१४.०० | ४,६७,९४,५३१.०० |
| | **इतर मालमत्ता** | | |
| १,१५,४७७.०० | फर्निचर व फिक्चर | १,०३,९२९.०० | |
| २८,११७.०० | संगणक व सॉफ्टवेअर | १८,८३८.०० | |
| १६,७८७.०० | डेड स्टॉक | १०,९४६.०० | |
| ४९९.०० | कलेक्शन मशिन / नोट कांऊटींग मशिन | ११,७२४.०० | |
| २,१४६.०० | एअर कंडिशन | २५,५४०.०० | |
| २४८.०० | प्रिंटर | ---- | |
| २,९७२.०० | डीसीएम मशीन | १,९९१.०० | |
| ६६२.०० | सी.सी.टिव्ही कॅमेरा | ---- | |
| ३,९६२.०० | सीबिल सॉप्टवेअर | २,६५५.०० | १,७५,६२३.०० |
| | **इतर येणी व अनामत** | | |
| ५,०००.०० | अनमता (एस.आर.ओ.) | ५,०००.०० | |
| ८,०००.०० | पी.सी.ओ. इन्सटयूमेंट | ८,०००.०० | |
| ३,०००.०० | पी.सी.ओ. डिपॉझिट | ३,०००.०० | |
| २,००,०००.०० | कार्यालय अनामत | २,००,०००.०० | |
| १५,१६५.०० | स्टेशनरी स्टॉक | १५,१६५.०० | |
| ५,०००.०० | बीईएसटी डिपॉझिट | ५,०००.०० | |
| ३,५५३.०० | अधेसिव्ह स्टॅम्प | ६,३१३.०० | |
| ४९,३५०.०० | वसुली चार्जेस | ---- | |
| १२,०००.०० | कलम १०१ चलन | ---- | |
| १,१०,५६४.०० | कोर्ट फि स्टॅम्प | ---- | |
| १,०६,७७३.०० | टिडीएस येणे | १,७४,३५५.०० | |
| ---- | निवडणूक अनामत | २,१०,०००.०० | ६,२६,८३३.०० |
| | **व्याज येणी** | | |
| १,५१,८०९.०० | बँक व्याज येणे | २,१२,११४.०० | २,१२,११४.०० |
| ५,६१,४१,९४४.३९ | | | ६,४३,०७,२३४.७९ |

| श्री. अशोक नि. नलावडे | श्री. कुंडलीक म. कांबळे | श्री. बबन म. कोल्हे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | क. सदस्य |

# संकल्प को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२२ | खर्च | | ३१/३/२०२३ |
|---|---|---|---|
| ५२,०४,३६८.०० | ठेव व्याज | | ५२,७९,०२८.०० |
| ५,५९,७१६.०० | पगार / वेतन / बोनस | | ६,५८,२३५.०० |
| २,४२,९६३.०० | कमीशन (दैनंदिन ठेवीवरील) | | ४,६६,४६८.०० |
| ५२,२३०.०० | मुंबई बँक अधिकर्ष व्याज | | ६,६८३.०७ |
| | प्रशासकीय खर्च | | |
| २४,७५९.०० | प्रवास खर्च | २३,२४५.०० | |
| ३७,२२३.०० | स्टेशनरी व छपाई | ६०,१७०.०० | |
| १,९०,०००.०० | कार्यालय भाडे | २,८७,०००.०० | |
| ३०,३२१.०० | किरकोळ खर्च | ३०,०८५.०० | |
| २६,६१४.०० | जाहिरात व देणगी | ४१,०८०.०० | |
| २,५७७.१० | बँक चार्जेस | ४,६८४.६० | |
| ९,३१०.०० | लाईट बिल | १२,५८०.०० | |
| १२,५३०.०० | पोस्टेज | २,६६३.०० | |
| १,००३.०० | चेक रिटर्न चार्जेस | २,४८५.०० | |
| ४०,१३३.०० | घसारा | ४८,२२०.०० | |
| १७,९२६.०० | विमा | २३,६३०.०० | |
| ३६,३४६.०० | वसूली खर्च | २,९८,८३७.०० | |
| १५,०००.०० | दिनदर्शिका खर्च | २५,०००.०० | |
| ---- | १०१ अंतर्गत कारवाई खर्च | १२,५००.०० | |
| ४८,६०१.०० | दिवाळी बक्षिस | १९,२२४.०० | |
| २३,१६०.०० | देखभाल व दुरुस्ती खर्च | ३४,१९५.०० | |
| १०,०००.०० | स्मार्टटेक (ए.एम.सी) | १०,०००.०० | |
| ---- | सहकार प्रशिक्षण खर्च | २२,९८४.०० | |
| ---- | वार्षिक सभा खर्च | ७,५७०.०० | |
| २,०२२.०० | टेलिफोन खर्च | १,५८०.०० | |
| २,५६०.०० | पाणी बिल | ५,८००.०० | |
| २,०००.०० | हेल्युएशण चार्जेस | ---- | |
| ४,४००.०० | इंटरनेट चार्जेस | ३,६००.०० | |
| ३,२५०.०० | संगणक दुरुस्ती | ---- | ९,७६,३३२.६० |
| | तरतुदी | | |
| ३३,१३१.०० | लेखापरिक्षण शुल्क | ५२,७०४.०० | |
| १,८२,६८६.०० | बुडीत कर्ज निधी | ६,००,०००.०० | ६,५२,७०४.०० |
| २,१७,११६.१० | निव्वळ नफा | | ६,५४,२०३.३३ |
| ७१,१२,८२६.०० | | | ८६,९३,६५४.०० |

हिशोब तपासले ते बरोबर आहेत. माझ्या दिनांकाच्या
अहवालात पात्र ठेवून दि. २९-०८-२०२३

**श्री. राजेश आर. गुलदगड**
प्रमाणित लेखापरीक्षक (को-ऑप. सोसायटीज, मुंबई - पॅनं नं. [illegible])

## दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२२ | जमा | | ३१/३/२०२३ |
|---|---|---|---|
| | **कर्जावरील व्याज** | | |
| ६०,४६,७४८.०० | कर्जावरील व्याज जमा | | ७५,११,६३०.०० |
| | **कर्जावरील दंड व्याज** | | |
| २,२१,२९५.०० | दंड व्याज | | १,५८,७७८.०० |
| | **गुंतवणूकी वरील व्याज** | | |
| ५,८९,९३९.०० | मुंबई बँक मुदत ठेव व्याज | ६,२३,००४.०० | |
| ३५,६२८.०० | मुंबई बँक (आर एफ) व्याज | ४३,५४९.०० | |
| ---- | कुर्ला बँक मुदत ठेव व्याज | २९,४४३.०० | |
| ---- | बँक मु ठेव व्याज (टी डी एस) | १,३६१.०० | |
| ५१.०० | लाभांश | ---- | ६,९७,३५७.०० |
| | **इतर जमा** | | |
| २५,१८१.०० | नोटिस फी | २२,७९०.०० | |
| १९,०३९.०० | कमीशन | ३०,४१०.०० | |
| ३३,७९४.०० | स्टेशनरी जमा | ५९,८०५.०० | |
| ३१,२१०.०० | सेवा शुल्क | ६०,८००.०० | |
| ७,०७३.०० | इतर जमा | ६७,११३.०० | |
| ८२०.०० | विलंब शुल्क | १,६५०.०० | |
| ७७,९२२.०० | लिगल वसूल चार्जेस | ७४,९७८.०० | |
| ५,७००.०० | चेक रिटर्न चार्जेस | ४,५६५.०० | |
| १८,४२६.०० | वसूली खर्च जमा | ---- | |
| ---- | ठेवीवरील ज्यादा व्याज | ३,४२०.०० | |
| ---- | एन ई एफ टी वसूली | ३५८.०० | ३,२५,८८९.०० |
| ७१,१२,८२६.०० | | | ८६,९३,६५४.०० |

**श्री. अशोक नि. नलावडे**
अध्यक्ष

**श्री. कुंडलीक म. कांबळे**
उपाध्यक्ष

**श्री. बबन म. कोल्हे**
क. सदस्य

# संस्थेच्या विविध आकर्षक ठेव योजना

## १. बचत ठेव खाते :

- ✱ आपण संस्थेमध्ये रुपये १००/- भरुन खाते उघडू शकता.
- ✱ सभासदांना या खात्यावर केव्हांही व कितीही रक्कम भरता येते व काढता येते.
- ✱ ठेवीवर ५% व्याज दिले जाते.

## २. दामदुप्पट ठेव :

- ✱ या ठेव योजनेत व्याज मिळून ८५ महिन्यात रक्कम दामदुप्पट मिळेल.

## ३. दैनंदिन ठेव :

- ✱ आपण जर छोटा धंदा करीत असाल तर किंवा आपल्याल दररोज मिळकत असेल तर आपण दररोज रक्कम १० च्या पटीने सदर ठेव योजनेत भरु शकता.
- ✱ ठरावीक कालावधीनंतर मोठी रक्कम मिळेल.
- ✱ मुदतीप्रमाणे व्याज दर वाढत जातो.
  (१ वर्ष ७%, २ वर्ष ८%, ३ वर्ष ९.००%)
- ✱ मुंदतीनंतर व्याजासह रक्कम परत मिळेल.

## ४. मुदत ठेव :

- ✱ संस्थेत रु १,०००/- च्या पटीत रक्कम स्विकारण्यात येते व त्यावर खालीलप्रमाणे व्याज मुदतीअखेर दिले जाते.

★ जेष्ठ नागरिकांना ०.५० % व्याजदर जादा दिले जाते.

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ६० दिवस | ६ % |
| ९० दिवस | ७ % |
| ६ महिने | ८ % |
| १ वर्षे | ९.५ % |
| २ वर्षे व जास्त मुदतीसाठी | १० % |

## ५. आर्वत ठेव :

आपण दरमहा रुपये १०० किंवा त्याच्या पटीत सदर ठेवीत रक्कम ठेवू शकता.

दरमहा पगार घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना उपयुक्त ठेव योजना.

आपल्याला खालीप्रमाणे रक्कम मिळेल.

| दरमहा रक्कम | १ वर्षे ९% | २ वर्षे ९.५०% |
|---|---|---|
| १०० | १,२६० | २,६२५ |
| ५०० | ६,२९३ | १३,१२५ |
| १,००० | १२,५८५ | २६,२५० |

## ६. मासिक प्राप्ती ठेव योजना :

या ठेव योजनेत आपण तीन वर्षे मुदतीसाठी रक्कम गुंतविल्यास आपणांस १०% प्रमाणे दरमहा व्याज दिले जाते.

## ७. संकल्प आर्वत ठेव योजना :

आपण दरमहा रुपये १०० किंवा त्याच्या पटीत सदर ठेवीत रक्कम जमा करु शकता मुंलांच्या उच्च शिक्षणासाठी किंवा मुलींच्या लग्नासाठी तरतूद म्हणून सदर ठेव योजना सुरु केली आहे.

| दरमहा रक्कम | मुदत | मुदतीनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००/- | ६ वर्षे २ महिने | रु. १०,०००/- |
| रु. २००/- | ६ वर्षे २ महिने | रु. २०,०००/- |
| रु. ५००/- | ६ वर्षे २ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १,०००/- | ६ वर्षे २ महिने | रु. १,००,०००/- |

## लखपती ठेव योजना

| रक्कम रुपये | गुंतवणुवकीच्या कालावधी | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १२,५००/- | २१ वर्षे ३ महिने | रु. १,००,०००/- |
| रु. २५,०००/- | १४ वर्षे २ महिने | रु. १,००,०००/- |
| रु. ५०,०००/- | ८५ महिने | रु. १,००,०००/- |

**गरजेसाठी कर्ज घ्या,**

**पण हप्ते वेळेवर भरा.**

**संस्था पुढील कारणासाठी कर्ज पुरवठा करते.**

**कर्जावरील व्याज दर १३% ते १६%**

वैयक्तिक जामीन कर्ज
वाहन तारण कर्ज
तातडीचे कर्ज
गृहोपयोगी वस्तु कर्ज
स्थावर तारण कर्ज
ठेव तारण कर्ज
सोने तारण कर्ज

# अध्यक्षांचे मनोगत



सन्माननिय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या सोसायटीचा ४५वा वार्षिक अहवाल आणि दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरचे वैद्यानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानीच्या आशिर्वादाने पावन झालेली संकल्प को-ऑप. क्रेडिट सोसायटीची वाटचाल प्रगती पथाच्या दृष्टीने पाऊले पडत असताना गेल्या दोन वर्षापासुन कोरोना सारख्या महामारी मुळे व्यावसायावर मंदीचे सावट आले व नोकरदारांच्या पगारात कापात झाल्यामुळे संस्थेची थकबाकी वाढली व संस्था वाढीला थोडा ब्रेक लागला अश्या अडचणीच्या काळातही खेळत्या भांडवलात वाढ झाली यांचे मला समाधान वाटते.

पतपेढीचे ३१/३/२०२२ च्या अखेरीचे खेळते भाग भांडवल रु. ५,६१,४१,१४४.३१ होते गेल्या वर्षात रु. ८१,६५,२९०.४० ने वाढ झालेली असुन चालु वर्षी खेळते भाग भांडवल रु. ६,४३,०७,२३४.७१ एवढे झाले आहे. संस्थेच्या सभासदांनी संस्थेवर विश्वास ठेवुन, संस्थेच्या कार्यकारणीस सहकार्य केले याचा मला आनंद होत आहे.

सहकारी चळवळशी संबधीत असणाऱ्या सर्वच पतसंस्थांना मार्च २००६ पासून एन. पी. ए. तरतुदीची प्रणाली लागू झालेली असुन याचा अर्थ या तरतुदी वाईट-जाचक आहेत असा मुळीच नसुन यामुळे संस्थेला लाभाचे वरदानच मिळून ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहतील, संस्था भविष्यातही प्रगती पथावर राहील यात तीळ मात्र शंका नाही. लागु केलेल्या एन. पी. ए. मुळे संशयीत व बुडीत कर्ज निधी / उत्तम जिंदगी निधीची तरतुद करावी लागते व ती रक्कम होणाऱ्या नफ्यातून वजा करावी लागते त्यामुळे संस्थेच्या हिताआड येणाऱ्या थकबाकीदार व त्यांचीशी संबंधीत असणाऱ्या जामीनदारांवरही कठोर कारवाई करणे भाग पडते तसेच करोना सारख्या महामारी मुळे व्यावसायावर मंदिचे सावट आले व नोकरदाराच्या पगारात कपात झाल्यामुळे अहवाल वर्षी ३१/३/२०२३ अखेर थकबाकीचे प्रमाण ७.२० टक्के आहे. अनुत्पादिक कर्जे (एन.पी.ए) यांची संस्थेने संपुर्ण तरतुद केलेली आहे. सन २०२२-२३ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ४.८७ टक्के आहे

संस्थेचे विद्यमान संचालक प्रामाणिक ईमाने इतबारे संस्थेचे विविध योजना व संस्थेचे कार्य संस्थेच्या नियमाचे पालन करून करतात यामुळे संस्थेचे कामकाज अध्यक्ष म्हणून मला काम करण्यास धन्य वाटते. त्याच प्रमाणे संस्थेचे ठेवीदार, सभासद, हितचिंतक व संस्थेच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन करणारे, तसेच संस्थेचे आधारस्थान मा. श्री. शिवाजीराव नलावडे यांचे संस्थेच्या व वैयक्तिक माझ्यावतीने मी आभार मानीत आहे.

संस्थेच्या सर्व कर्जदारांना मी कळकळीची विनंती करतो की घेतलेले कर्ज वेळेवर परत फेड करून, नवीन कर्जदारांना कर्ज देण्यासाठी संस्थेची पत अबाधित राखावी. तसेच काही कर्जदार हे करोना महामारी मधुन थकीत गेले आहे त्यांच्यावर कलम १०१ खाली कारवाई केलेली आहे तरी पण अजूनही थकबाकी भरत नाही तर त्यांच्यावर कठोर कारवाई करून भविष्यात त्यांची मालमत्ता ताब्यात घेऊन लिलाव पध्दतीने विक्री करण्याची प्रक्रिया चालू आहे तरी पुढील कारवाई टाळण्यासाठी थकीत कर्जदारांनी थकबाकी भरावी व N.P.A. मधून बाहेर काढावे अन्यथा त्यांच्यावर नाविलाजाने कठोर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

पुन्हा एकदा सर्व सभासद, ठेवीदार, हितचिंतक व मार्गदर्शकांचे आभार मानतो. आपल्या संस्कृतीनुसार चालत असलेल्या म्हणीप्रमाणे या जन्मावर व जे इतरांसाठी करता येईल ते करावे सहकारी क्षेत्रामध्ये सहकार्याच्या भावनेतून एकसंघ सहकार्य करावे अशी अपेक्षा करून मी माझे मनोगत इथेच संपवितो.

आपला विश्वासू,

श्री. अशोक [illegible] नलावडे

# संकल्प को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

## ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे क्षणचित्रे










नवनियुक्त संचालक व निवडणूक निर्णय अधिकारी

**श्रीमती प्रियंका गाडीलकर**

(उप निबंधक सहकारी संस्था 'एल' विभाग

---

**सभासद क्र. :**

**प्रति,** ______________________

______________________

______________________

**बँकर्स**

दि मुंबई जिल्हा मध्य. सहकारी बँक लि., साकीनाका शाखा, मुंबई - ४०० ०७२.

दि मुंबई जिल्हा मध्य. सहकारी बँक लि., साकीनाका शाखा, मुंबई - ४०० ०७२.

के.एन.एस.बँक लि., साकीनाका शाखा, मुंबई - ४०० ०७२.